# राजर्षी शाहू महाराज यांचा शैक्षणिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक सुधारणा

**प्रा. श्रीरंग अरविंद तराळ** सहाय्यक प्राध्यापक न्यू कॉलेज, कोल्हापूर.मो.नं. – 9637737062

---

**प्रस्तावना :-**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे केवळ राजा, समाजसुधारक, लोकनेता नव्हे तर इतिहासाला कलाटणी देणारे आणि नवा इतिहास घडविणारे महान समाजपुरूष होते. बहुजनांच्या, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेत. राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार आणि तत्वज्ञानाचा केंद्रबिंदू हा मानव असल्याने स्वातंत्र, समता आणि न्याय यावर त्यांची दृढ श्रध्दा होती.

आधूनिक समाजव्यवस्थेत शिक्षणाचे महत्व राजर्षी शाहूंनी ओळखले होते. शिक्षणातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, परिवर्तन करता येते ही त्यांची भावना होती. समाजातील विषमतेची दरी व शोषणमुक्त समाजानिर्मितीसाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. हे राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले होते. यासाठी आपल्या संस्थानामध्ये शिक्षणाला अधिक महत्व देऊन संस्थाना आर्थिक सहाय्य केले व त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले.

समाजपरिवर्तनातील शिक्षणाचे महत्व प्रथम म. फुले यांनी ओळखले होते समाज परिवर्तनातील शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणाविषयक विचार आपल्या करवीर संस्थानामध्ये यशस्वीरित्या राबविणारा 'लोकराजा' या नात्याने राजर्षी शाहू महाराज यांचे नांव घ्यावे लागते राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रातील लोकलल्याणकारी महान कार्य सर्वव्यापक आहे. या कार्यक्षेत्राच्या तुलनेत शिक्षण क्षेत्रातील महान कार्य विशेष उल्लेखनिय आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा, शिक्षण विषयक दृष्टिकोनाचा परामर्श प्रस्तुत शोध निबंध लेखनात केला आहे.

**राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार-**

नवसमाज निर्मितीसाठी प्रत्येकास शिक्षण दिले पाहिजे ही समतावादी भूमिका शाहू महाराजांनी पत्करली होती. प्रत्येकाला ज्ञान प्राप्तीचा हक्क आहे. ज्ञानाशिवाय मनुष्याचा किंबहुना पर्यायाने सर्व समाजाचा विकास होणार नाही ही मानवतावादी जाणीव शाहू महाराजांच्या मनात होती. शिक्षण प्रसाराशिवाय सर्व समाजात सांस्कृतिक आणि वैचारिक अभिसरण सुरू होणार नाही. असा शाहू महाराजांचा दृढ विश्वास होता. तसेच, प्रत्येक व्यक्तिंचे सामर्थ्य आणि कौशल्य वाढविण्यास शिक्षणच हातभार लावणार आहे अशी शाहू महाराजांची श्रध्दा होती. मग तो कामगार, शेतकरी असो वा सैनिक समाजातील प्रत्येक घटकास शिक्षणाची गरज आहे. सन 1918 साली मुंबईत भरलेल्या मागासवर्गीय लोकांच्या जाहीर सभेत शाहू महाराज म्हणाले होते की, "हल्ली शेतकी इतकी पध्दत शीर झाली आहे की, ज्याला यश मिळवायचे आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत.

**राजर्षी शाहूंचे शिक्षणा संबंधी दृष्टिकोन -** राजर्षी शाहूंचे शैक्षणिक कार्य अत्यंत प्रभावशाली असून शिक्षणाकडे त्यांनी सुधारणात्मक दृष्टिकोनातून पाहिले. शिक्षण हे एका बाजूने सामाजिक व राष्ट्रीय गरज म्हणून पाहिले तर दुसरीकडे वैयक्तिक गुरूकिल्ली असल्याचे मत नोंदविले आहे. म्हणून समाजात शिक्षणाचा अभाव आहे हे ओळखून त्यांनी राजकीय स्वातंत्र्या पेक्षा विद्याप्रसार म्हणजेच शिक्षणाचा प्रसार महत्वाचा वाटला. म्हणून बहूजन समाजाच्या उन्नतीकरिता शिक्षण हे महत्वाचे साधन आहे हे ओळखून त्या दृष्टिकोनातून शिक्षणासंबंधीची विचारसरणी विकसित होत गेली. बहुजन समाजात खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्याने देशाची मोठी हानी झाली आहे. यासाठी शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे. तसचे, शिक्षणाशिवाय समानता निर्माण करणे शक्य नाही. म्हणून भारतातील स्त्री - पुरूष दोघांनाही शिक्षणाची आवश्यकता आहे. त्याशिवाय कोणतेही राष्ट्र स्वातंत्र व बलवान होऊ शकत नाही ही भूमिका लक्षात घेऊन राजर्षी शाहूंनी शिक्षण क्षेत्रातील सुधारणांना अग्रक्रम व प्राधान्य दिले.

सर्वसामान्य लोकांच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हा मुलभूत पाया आहे. समाजातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी, प्रथा - परंपरा नष्ट करायचे असेल तर निरंतर शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे यावर शाहू राजांचा विश्वास होता. म्हणून आपली प्रजा निरक्षर असू नये, तिचा सर्वांगीण विकास व्हावा ही तळमळ आणि समाज विकासाचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे.

**सर्वांसाठी शिक्षण -** आपल्या समाजातील दुर्लक्षित, दु:खी, दलित हीन - दीन लोकांना शिक्षणाने बलशाली करण्याचे ध्येय राजर्षींना लागले होते कारण शाहू पूर्वकाळातील शिक्षण विषयक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. गतकालीन शिक्षणविषयक परिस्थितीचे चित्र रेखाटताना राजर्षी शाहू महाराज म्हणाले होते की, "शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातली एक अंधारी रात्र आहे" फक्त एका जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू अणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले. व खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. म्हणून शिक्षणाच्या पायावरच समाजाची उन्नती करता येईल हा विचार करूनच सार्वत्रिक व मोफत व सक्तीच्या शिक्षणास सुरूवात केली.

**शैक्षणिक दृष्टिकोनात्मक अमंलबजावणी**

**i. आधी शिक्षण मग स्वराज्य -** सर्व समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ आपली सत्ता आणि संपत्ती खर्च व्हावी अशी राजर्षींची इच्छा होती. म्हणूनच ते म्हणत होते की, "माझ्या रयतेमध्ये प्रामाणिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली

आहे. यावरून शक्य तितक्या लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता जरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती.

**ii. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण -** शिक्षणाने सशक्त झालेल्या लोकांपेक्षा शिक्षणाच्या अभावाने अशक्त झालेल्या लोकांकडे अधिक लक्ष देणे शाहू महाराजांना योग्य वाटत होते. म्हणूनच, शाहू महाराजांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. आपल्या देशाला अशा मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची फार मोठी गरज आहे. याविषयीचे शाहू महाराजांचे विचार मोठे मार्मिक आहेत. सन 1882 मध्ये म. फुले यांनी पाहिलेले मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे स्वप्न राजर्षी शाहू महाराजांनी 1913 साली खरे करून दाखविले.

मोफत व सक्तीच्या शिक्षणाची जरूरी सांगताना शाहू महाराज म्हणतात की, " खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी कर लादले गेले आहेत ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची जरूरी आहे. त्याकरिता सक्तीच्या शिक्षणाची कायदा करून अंमलात आणला. कारण - पुढील पिढी तरी लिहिणारी वाचणारी होईल अशी मला खात्री आहे. शाहू महाराजांना समाजातील जातिभेदाच्या भिंती पाडून शिक्षणासाठी एकच व्यापक व्यासपीठ तयार करावयाचे होते. त्यासाठी सर्व जातीच्या मुलांनी एकत्र बसून शिक्षण घेतले पाहिजे यावर राजर्षिंचा कटाक्ष होता. यावरून राजर्षींचा शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन दिसून येतो.

**iii. राजर्षी शाहूंचा शिक्षण विस्तार -** समाजक्रांती घडवून आणण्यासाठी व बहूजन समाजाची सर्वकष प्रगती साधण्यासाठी शिक्षणप्रसाराचे व्रत निष्ठेने व परिश्रमपूर्वक आचरणात आणण्याचे प्रयत्न राजर्षी शाहूंनी सुरूवातीपासून सुरू केले आणि कोल्हापूर संस्थानात शिक्षण प्रसाराची चळवळ सुरू केली आणि विद्यार्थी वसतिगृहे स्थापन केली.

शिक्षण कार्याचा विस्तार कोल्हापूर संस्थान बाहेर देखील शाहूमहाराजांनी केले असून बहूजन समाजाच्या शिक्षणासाठी कार्यरत असणाऱ्या शाळा, वसतिगृह व शिक्षण संस्थाना मदत, अर्थसहाय्य केल्याची नोंद दिसून येते. यामध्ये पूणे, नाशिक, अहमदनगर, नागपूर, पंढरपूर, मुंबई येथील अनेक शिक्षण संस्थाना भरीव अर्थसहाय्य केल्याचे दिसून येते तसेच, शाहू महाराज स्वत: पदसिध्द अध्यक्ष असलेल्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे ही संस्था, तसेच 'हिंदू विश्वविद्यालय' संस्थेस निधी दिलेलेआहे. आणि मद्रास येथील 'डॉ. टी.एस.नायर मेमोरियल स्कॉलरशिप' साठी 5000/- रूपयांचा निधी रामस्वामी मुदलियार यांच्याकडे दिल्याची नोंद दिसून येते.

**iv. कायद्यामधून प्रतिबिंबित होणारे शिक्षणविचार**

राजर्षी शाहू महाराज यांनी 2 एप्रिल 1894 रोजी अधिकारपद ग्रहण केल्यानंतर शाहू महाराजांनी जाहीर केले होते की, "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत, त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूनी विकास व्हावा, अशी आमची इच्छा आहे."

कोल्हापूर संस्थानातील अंधश्रध्दा, अज्ञान आणि अनारोग्य प्रथा या परिस्थितीचे शाहू महाराजांना अतिशय दु:ख झाले. कोल्हापूर संस्थानात सार्वजनिक शिक्षण प्रसार करण्यासाठी संपूर्ण आयुष्य व्यतित केले आहे. संस्थानात शैक्षणिक सुधारण्या घडवून आणण्यासाठी अनेक शैक्षणिक कायदे केले. यामध्ये सक्तीच्या शिक्षण कायद्यात - प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे, उच्च नीच भेदभाव निर्मुलन, 7ते 14 वर्षे वयाच्या मुलांना शिक्षण सक्तीचे, शाळेत मुले न आल्यास पालकांकडून 1 रू. दंड आकारला इ.

**v. शैक्षणिक चळवळीचा प्रधान हेतू -**

मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी केल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक चळवळीचा हेतू विशद करताना म्हटले होते- "मागासलेल्या लोकांना चेतना देऊन त्यांच्यामध्ये प्राथमिक व उच्च शिक्षण घेण्यास प्रेरणा निर्मिली पाहिजे व शिक्षण घेण्यास त्यांना उद्युक्त केले पाहिजे हा शिक्षणाचा प्रधान हेतू असल्याचे स्पष्ट केले होते.

**सुधारणात्मक कार्य -**

**i. शिक्षणविषयक तत्वज्ञान-** राजर्षी शाहू महाराज यांनी केलेली सर्व जाती धर्मियांच्या शिक्षणाची काळजी वाहू कृती म्हणजे त्यांच्या युगप्रवर्तक धैयाची आणि कृतिशूरपणाची प्रकाशमान पताकाच होय. शैक्षणिक सुधारणा विषयक केलेले कायद्याचे तत्वज्ञान पु. प्रमाणे दिसून येते - i. प्राथमिक शिक्षण पुढील शिक्षणाची पायरी आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे. ii. शिक्षकांना प्रशिक्षण देणे iii. गाव तेथे शाळा, iv. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शाळा पंच पध्दती सुरू केली. v. शिक्षण विषयक कर आकारणी करणे.

**ii. शाहूकालीन स्त्रियांची स्थिती -** राजर्षी शाहूंच्या काळी सतीप्रथा, स्त्री शिक्षणास बंदी, बालविवाह, बहुपत्नीकत्व, केशवपन, विधवा विवाह बंदी अशा अनिष्ट प्रथा समाजात होत्या या प्रथा नष्ट होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून स्त्रियांच्या शिक्षणासाठी अनेक शैक्षणिक कार्य, उपाययोजना केल्या. यामध्ये मुलींच्या शिक्षणास विशेष उत्तेजन दिले. यामध्ये रखमाबाई केळवकर या महिलेस लेडी सुपरिटेडेंट पदी (शिक्षणाधिकारी) नेमणूक केली. तर 4 थी पास परीक्षेत जास्त गुण मिळविणाऱ्या मुलींना 40 रू. प्रमाणे 5 शिष्यवृत्त्या दिल्या. तसेच, भूदरगड येथे मुलींच्या शाळा स्थापन केल्या. तसेच, बहुजन समाजाच्या पहिल्या डॉक्टर महिलेस कोल्हापूरच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये महत्वाची जबाबदारी सोपविली.

**iii. वसतिगृह चळवळीचे उद्गाते -** खेड्यापाड्यातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या राहण्या जेवणाची व्यवस्था व्हावी म्हणून वसतिगृहे स्थापन करून कोल्हापूर संस्थानातील शिक्षण व्यवस्थेला परिपूर्णत्व देण्याचे महान कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केले. सन 1896 मध्ये राजाराम कॉलेज मध्ये उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी कॉलेजला जोडून एक वसतीगृह स्थापन केले होते.

देशात सर्वप्रथम स्त्री शिक्षण विषयक विचार सन 1848 पूणे येथे पहिली मुलींची शाळा शिक्षण महर्षी म. जोतीराव फुले यांनी सुरू करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. हे महान कार्य पुढे आपल्या करवीर संस्थानात राजर्षी शाहू महाराज यांनी अविरत चालू ठेवले. स्त्री शिक्षणाकडे सात्विक बुध्दीने, मानवतावादी दृष्टीने आणि समाजवादी तत्वाने समानतेच्या भूमिकेतून पाहणारा महापुरूष म्हणजे राजर्षी शाहू महाराज.

**विद्येच्या मक्तेदारी संपुष्टात** -विद्या संपादन करणे हे विशिष्ट जातीची मक्तेदारी राहिली होती तेव्हा लोककल्याणाचा वसा घेतलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर संस्थानात प्राथमिक शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणावरही भर दिला होता यासंदर्भात 27 जुलै 1920 रोजी हुबळी येथील भाषणात शिक्षण वंचितांच्या अंतरंगामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून सामर्थ्य निर्माण करण्याची राजर्षींची अष्टावधानी दृष्टी आदर्शवत आहेच तसेच, सर्वसाधारण माणसाला शिक्षण देऊन 'समान संधीचे तत्वज्ञान' लोकांच्या मनामध्ये रूजविण्याचे काम राजर्षींनी केले.

**बहुजन समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ स्वावलंबन शिक्षण -**

शिक्षण हे समाज उन्नतीचे साधन आहे हे ओळखून शाहू महाराजांनी शिक्षणातून समाजसुधारणा व स्वावलंबन केले हे शैक्षणिक सामाजिक कार्य करीत असताना प्रतिगामी ब्राम्हणी व्यवस्थेचा विरोध व इंग्रज सरकारच्या रोषाची तमा न बाळगता 'महाराष्ट्रातील अस्पृशासकट तमाम मागासलेल्या बहुजन समाजाचा उध्दार हे माझे पवित्र जीवनकार्य आहे. हे पवित्र कार्य संपूर्ण आयुष्यभर निष्ठापूर्वक केले आहे. तसेच, समाजातील जतिभेदाचे निर्मूलन करताना चातुर्वण्य व्यवस्थेतील ब्राम्हण समाजाने केलेल्या संपूर्ण वंचित बहुजन समाजावरील केलेल्या अन्यायाचे प्रथम समुळ नष्ट करून आपल्या समाजाविकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व जाती धर्मांना हाताशी धरून पूर्णत्वास करताना शिक्षण ही काळाची गरज असून त्यास प्राधान्य दिले हा राजर्षी शाहू महाराजांचा दूरदृष्टिकोन दिसून येतो.

**निष्कर्ष -**

1. स्वातंत्र्य, समता, बंधूता ही लोकशाहीची मुल्ये प्रथम करवीर संस्थानात शाहू महाराजांनी रूजविली.
2. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री शिक्षणाच्या सक्षमीकरणाचे मौलिक कार्य केले आहे.

**समारोप -**

राजर्षी शाहू महाराज यांनी स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय ही तत्व प्रणाली जोपासत सामाजिक शैक्षणिक सांस्कृतीक, आर्थिक क्षेत्रात महान कार्य केले आहे. राजर्षींच्या जीवनाचा स्थायीभाव शिक्षणप्रसार होता. आपल्या राज्याची सूत्रे हाती येताच राजर्षींनी सर्वप्रथम शिक्षण प्रसाराला सुरूवात केली. सन 1894 ते 1922 पर्यंत सतत 28 वर्षे शिक्षण प्रसाराचे महान कार्य केले यामध्ये शाळा, महाविद्यालये, शिक्षण संस्था, वसतिगृहे, आणि अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करून कोल्हापूर हे महाराष्ट्रातील उत्कृष्ट शिक्षणकेंद्र केले.

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी राजर्षींची प्रामाणिक धारणा होती. म्हणूनच जीवनभर शिक्षण प्रसाराचे व्रत घेऊन अत्यंत तळमळीने, समर्थाण भावनेने व व्यापक निष्ठेने शैक्षणिक कार्य करणे भारतातील पहिले महापुरूष म्हणने राजर्षी शाहू महाराज होय.

**सदंर्भ -**

1. भगत रा. तु. - 'शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज', सिध्दराज प्रकशन, पुणे. प्र. आ. जानेवारी 1999,
2. पवार, जयसिंगराव - राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य. कोल्हापूर प्र. आ. 29 जून 2009
3. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, शुक्रवार पेठ पुणे - प्र. आ. 30 ऑगस्ट 1997.
4. पवार वसुधा जयसिंगराव - राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास - सुमेरू प्रकाशन टिळकनगर डोंबिवली (पुर्व) प्र. आ. 2004.
5. भगत.रा.तु. - राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिध्दराज प्रकाशन, पुणे प्र.आ. 17 जून 2003
6. नवरंगे ज्योती - राजर्षी शाहूंचा शिक्षण विषयक दृष्टिकोन - प्र. आवृत्ती - 2011
7. बगाडे द.रा. - शाहू महाराज आणि कायदेकानू : पद्मप्रकाशन, कोल्हापूर. प्र. आ. 1982